वर्ष ४५
अंक ९

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील
एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर २०२५
भाद्रपद/आश्विन
शके १९४७

नमस्कार मंडळी

|| मंगलमूर्ती मोरया - गणपती बाप्पा मोरया ||




गणरायांचे आगमन झालेले आहे आणि सर्वजण आनंदात गणेशोत्सव साजरा करीत आहेत. पुढील काही दिवस सर्वांसाठी धामधुमीचे असणार आहेत. तुम्हा सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा! “सार्वजनिक गणेशोत्सवाची” सुरुवात करणाऱ्या लोकमान्य टिळकांचे पणतू, श्री किरण केतकर, यांची नुकतीच ह्युस्टन येथे भेट झाली. त्यांच्या बरोबर संवाद साधायची मला संधी मिळणे हा एक सुखद अनुभव होता.

सध्या अमेरिका आणि भारताचे राजकीय संबंध अधिकच्या करामुळे तणावाचे झाले आहेत. याचा फटका अनेक उद्योजकांना, तसेच ग्राहकांनाही होणार आहे. हा प्रश्न लवकरात लवकर सुटावा अशी मागणी आणि प्रार्थना मी विघ्नहर्त्या गणरायांकडे करतो.

मागील आठवड्यात 'युवा' उपक्रमातर्फे ‘गणेश मूर्ती’ बनवण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. तेव्हा बारावी मध्ये शिकणाऱ्या पिट्सबर्गच्या ओजसीने गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेतली. त्यात अनेक शालेय विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. उत्तर अमेरिकेतील अनेक घरांमध्ये ह्या बाल मंडळींनी साकार केलेल्या गणेश मूर्ती विराजमान होणार आहेत ही खूपच आनंदाची बाब आहे.

जवळ जवळ सर्व मंडळांमध्ये गणेशोत्सव सप्टेंबर मधील पहिल्या दोन आठवड्यांमध्ये साजरा होईल. हा वर्षातला एक मोठा उत्सव असतो. अनेक कलाकार आपले कार्यक्रम यावेळी सादर करतात. त्या सर्वांना शुभेच्छा. तसेच मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना वर्षातील या सर्वात मोठ्या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल शुभेच्छा!

'समाजरंग' या उपक्रमातर्फे मी सर्व मंडळाच्या अध्यक्षांना परत एकदा आवाहन करतो की त्यांनी मंडळाच्या गणपती समोर जमलेली दक्षिणा कोणत्याही सामाजिक संस्थेला देणगी दाखल द्यावी, तसेच जमल्यास एखादे 'निधी संकलन' ही जाहीर करावे. बृहन्महाराष्ट्र मंडळाने 'महाराष्ट्र फाउंडेशन' या संस्थेबरोबर एक सामंजस्य करार केलेला आहे, त्यामुळे तुम्हाला भारतात देणगीचे पैसे पाठवायचे असतील तर ते सहज रितीने पाठवता येतील. वैयक्तिक पातळीवरही जर तुम्हाला मोठी देणगी एखाद्या संस्थेला द्यायची असेल तरी पण कृपया मला संपर्क साधा.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळा उपक्रमातर्फे यावर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत “पाठ्यपुस्तके निर्मिती”चा एक मोठा उपक्रम राबवला गेला. वेगवेगळ्या शिक्षकांचे गट करून बालवर्ग, तसेच पहिली ते पाचवीची पुस्तके, त्याचबरोबर प्रत्येक वर्गाच्या शिक्षकांसाठी 'प्रशिक्षण पुस्तिका', अशी एकूण ११ पुस्तके प्रकाशित करण्यात आली. या उपक्रमात भाग घेणाऱ्या सर्व स्वयंसेवक शिक्षकांचा मी आभारी आहे. जेव्हा आपले बालमित्र ही पुस्तके वाचतील, किंवा त्यात गृहपाठ करतील, तेव्हा आपल्या शिक्षकांनी घेतलेल्या कष्टांचे चीज होईल. जवळपास सर्व मंडळांच्या मराठी शाळा आता सुरू झाल्या आहेत. यावर्षी प्रथमच आपण बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पाठ्यपुस्तकांची विक्री मंडळाच्या संकेतस्थळावरून केली. त्याला सर्व शाळांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला, त्याबद्दल मी सर्व शिक्षकांचा तसेच पालकांचा आभारी आहे.

गेल्या महिन्यात ‘बालभारती’च्या पदाधिकाऱ्यांनी सलग १२ दिवस आपल्या मराठी शाळेच्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण दिले. यात ‘नव्या शैक्षणिक धोरणा’नुसार विद्यार्थ्यांचे ‘शैक्षणिक मूल्यांकन’ कसे करायचे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. अनेक मराठी शाळेच्या शिक्षकांनी या प्रशिक्षणाचा फायदा घेतला. त्या सर्व शाळा शिक्षकांचे अभिनंदन! ज्या शिक्षकांना हे प्रशिक्षण घेता आले नाही त्यांना बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे प्रशिक्षणाचे व्हिडिओ दाखवले जातील.

न्यू जर्सी येथे झालेल्या 'रेशीमगाठी' मेळाव्याच्या यशस्वी आयोजनानंतर आम्ही आता पोर्टलंड, ऑरिगन येथे शनिवारी ४ ऑक्टोबरला २०२५ रोजी विवाहोत्सुक मंडळींसाठी एक मेळावा आयोजित करीत आहोत. अधिक माहितीसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्या. bmmonline.org/reshimgathee

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे पुढील महिन्यात सुप्रसिद्ध नाट्य अभिनेते प्रशांत दामले यांच्या "शिकायला गेलो एक" या नाटकाचा दौरा होत आहे. १६ मंडळांमध्ये या नाटकांचे प्रयोग होत आहेत, त्या सर्व मंडळांना या नाटकाच्या आयोजनासाठी शुभेच्छा.

५ सप्टेंबर हा दिवस भारतात "शिक्षक दिन" म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी महाविद्यालयीन प्राध्यापक, शालेय शिक्षक. तसेच आपल्या मराठी शाळेतील सर्व शिक्षकांना हार्दिक शुभेच्छा! नवीन पिढीला शिक्षक घडवतात, त्यामुळे त्यांचे योगदान हे खरोखरच वाखाणण्याजोगे आहे.

या महिन्याच्या शेवटी नवरात्रीची सुरुवात होत आहे. सर्व देवी भक्तांना घटस्थापनेच्या, तसेच नवरात्रीच्या शुभेच्छा!

जय हिंद - जय महाराष्ट्र! आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-

**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**


**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**


वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका


**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| कविता: भवानी | ४ |
| बालक पालक उपक्रम | ५ |
| लक्ष्यवेधी | ६ |
| अर्थमंथन: ऑप्शन्स का महत्त्वाचे आहेत? | ६ |
| उत्तररंग | ८ |
| मराठी शाळा - निबंध स्पर्धा | १० |
| नाफा मराठी चित्रपट महोत्सव २०२५ | ११ |
| स्त्री शक्ती - एक खोल गूढ | १३ |
| कविता: गणित आयुष्याचे ..... | १५ |
| श्री गजानन महाराज गुरुपौर्णिमा उत्सव २०२५ | १५ |
| जाहिरात | १६ |
| अवघड पण मनोरंजक परिस्थिती | १७ |
| श्रद्धांजली | १७ |
| जाहिरात | १९ |
| MANA Paintings | २० |


## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :

Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नमस्कार. ऑगस्ट महीना किती धामधुमीत गेला ना? उन्हाळ्याची सुट्टी, भारतवारी, कौटुंबिक सहली, कॅम्पिंग, श्रावणातले सण, व्रतवैकल्ये, भारताचा ७९ वा स्वतंत्र्यदिन अशा कितीतरी गोष्टींनी ऑगस्ट महिना गजबजून गेला. ह्या आठवणी ताज्या असताना आता भाद्रपद सुरु देखील झाला. हे वृत्त तुमच्या हातात येईपर्यंत आपला लाडका गणपतीबाप्पा घराघरात विराजमान झालेला असेल. आरत्या, प्रसाद, भेटीगाठी यांत सगळे रमलेले असतील. त्यातच शाळा-कॉलेजेस सुरू होण्याची लगबग, लेबर डेच्या सुट्टीची उत्सुकता असेल. या उत्साही वातावरणात आपण आणखी एका मोठ्या सोहळ्याकडे वाटचाल करत आहोत – सिॲटल् ला होणारे BMM2026 स्नेहसंमेलन. स्नेहसंमेलन ११ महिन्यांवर येऊन ठेपलय, तयारीला जोम चढलाय. निधी संकलन, प्रायोजकांशी बोलणी, कार्यक्रम आखणी ह्या बरोबरच इतर अनेक विविध पातळ्यांवर आमची स्वयंसेवकांची फौज कार्यरत आहे.



सर्वप्रथम BMM2026 साठी होणाऱ्या स्पर्धांविषयी. ह्या स्नेहसंमेलनासाठी आम्ही अनेक स्पर्धांचं आयोजन करत आहोत. एकांकिका स्पर्धा, स्मरणिकेसाठी कथा स्पर्धा, चित्रकारांसाठी कलास्पंदन स्पर्धा यांची अधिकृत घोषणा झालेलीच आहे.

**नाट्यसृजन एकांकिका स्पर्धा:**
bmmseattle2026.org/natyasrujan-ekankikaspardha/

**कथा स्पर्धा:** bmmseattle2026.org/smaranika/

**'रंग महाराष्ट्राचे' कलास्पंदन स्पर्धा:**
bmmseattle2026.org/kalaspandan-artgallery/

आम्हांला कळवायला अतिशय आनंद होत आहे की गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर आम्ही अजून एका स्पर्धेची घोषणा करीत आहोत -

**तालश्रेष्ठ वादनोत्सव – BMM2026 ढोल-ताशा स्पर्धा!**

ढोल, ताशा, लेझीम, झांज, ध्वज – म्हणजे हिंदवी स्वराज्य, मराठी पराक्रम, इतिहास, संस्कृती आणि लोककलेचा अभिमान, सन्मान आणि प्रत्येक मराठी समारंभाची शान. आम्ही उत्तर अमेरिकेतील सर्व ढोल पथकांना आपली कला आणि दमदार सादरीकरण दाखवण्यासाठी उत्साहाने आमंत्रित करत आहोत. तुमच्यासाठी मराठी समुदायाच्या सर्वात मोठ्या मंचावर चमकण्याची आणि सर्वांसाठी सुंदर आठवणींनी भरलेले क्षण निर्माण करण्याची ही एक उत्तम संधी आहे.

👉 ढोल-ताशा स्पर्धेची ऑडिशन फेरी आता अधिकृतरीत्या सुरु झाली आहे. 📅 **तालश्रेष्ठ वादनोत्सव - महत्त्वाच्या तारखा:**
**ऑडिशन प्रवेशिका अंतिम मुदत: ११ नोव्हेंबर, २०२५**
**ऑडिशन निकाल: १५ जानेवारी, २०२६ पर्यंत**
**पात्र पथकांची सिॲटल् मध्ये प्रत्यक्ष स्पर्धा: ६-९ ऑगस्ट, २०२६.**

महाराष्ट्रातील ढोल-ताशाचे प्रतिष्ठीत जाणकारांचे पॅनेल ऑडिशन फेरीचे परीक्षण आणि गुणांकन करतील. प्रवेशिका आणि स्पर्धेच्या नियमांविषयी सर्व माहिती bmmseattle2026.org/dhol-tasha इथे उपलब्ध आहे. आपली प्रवेशिका पाठवण्यासंबंधी कुठलीही अडचण आल्यास किंवा स्पर्धेविषयी काही शंका असल्यास dholtasha@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर आमच्याशी नक्की संपर्क साधा.

BMM2026 मधील उद्योग महोत्सव म्हणजेच **EXPO** तुम्हाला तुमच्या ग्राहक, भागीदार आणि समर्थकांसमोर तुमच्या व्यवसायाचे प्रदर्शन करण्याची संधी देत आहे. स्नेहसंमेलनातील हजारो लोकांची उपस्थिती म्हणजे मराठी उद्योजकांना जाहिरातीची आणि उत्पादन विक्रीसाठी एक नामी संधी. ह्या संमेलनासाठी आमच्या एक्स्पो टीमने तुम्हाला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचता यावं यासाठी आणि एक्स्पोसंबंधी गरजा आणि उद्दिष्टे लक्षात घेऊन छान पॅकेजेस तयार केली आहेत.

तेव्हा एक्स्पोच्या वेबपेजवर लवकरात लवकर नाव नोंदवून तुमचा सहभाग निश्चित करा. कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया एक्स्पो टीमशी ईमेल पत्त्यावर संपर्क साधा:
Expo webpage: bmmseattle2026.org/expo
Expo Email ID: expo@bmmseattle2026.org

भारतातील कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी प्रस्ताव पाठवण्याची अंतिम मुदत जवळ येत आहे. जर तुम्ही किंवा तुमच्या ओळखीचे कलाकार भारत किंवा इतर देशातून कार्यक्रमासाठी प्रस्ताव पाठवू इच्छित असाल, तर ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत ते आम्हाला पाठवा. उत्तर अमेरिकेतील कलाकारांसाठी थोडा अधिक वेळ आहे पण अंतिम मुदतीपर्यंत म्हणजे दिवाळी पाडव्यापर्यंत न थांबता आपले प्रस्ताव

लगेच आमच्यापर्यंत पाठवा. आम्ही तुमच्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमांची उत्साहाने वाट पाहत आहोत. अधिक माहिती आणि प्रस्ताव प्रवेशिका इथे पहा: bmmseattle2026.org/programming-rfp/

आमच्या सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार! तुम्ही अजून पॅकेजेस विकत घेतली नसतील तर हीच ती वेळ आणि हाच तो क्षण! येत्या अनंत चतुर्दशीनंतर म्हणजेच ६ सप्टेंबर २०२५ नंतर आमच्या Bronze आणि Silver पॅकेजेसच्या किंमती वाढणार आहेत. ह्याबद्दलची सर्व माहिती आमच्या संकेतस्थळावर आणि social media वर उपलब्ध आहे. त्यामुळे त्वरा करा आणि गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर आपलं पॅकेज खरेदी करा. bmmseattle2026.org/individual-donor-package-tiers/

अधिक माहिती वा शंका निरसनासाठी सर्व इच्छुक देणगीदारांना विनंती आहे की त्यांनी आमच्याशी donations@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधावा.

BMM2026 चं संपूर्ण संकेतस्थळ आमच्या प्रतिभाशाली आणि उत्साही स्वयंसेवकांनी बनलेल्या वेब-टीमद्वारे विकसित केलं जात आहे. स्नेहसंमेलनासंबंधित सर्व माहितीशिवाय आपल्याला आमच्या सुकाणू समितीतील सर्व सदस्यांची ओळख छायाचित्र आणि अल्प परिचय यांद्वारे करून घेता येईल. स्नेहसंमेलनासाठी किती दिवस शिल्लक आहेत ह्याचा गमतीशीर countdown बघायला मिळेल. आमचं Youtube चॅनल ही आता सुरू झालेलं आहे.

२६ जुलै २०२५ रोजी सकाळी आमची All Hands मीटिंग पार पडली. स्वयंसेवकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आणि उपस्थिती समाधानकारक होती. प्रत्येक टीमच्या प्रमुखांनी आपापली स्लाईड दाखवून टीमच्या कामाच्या सद्यस्थितीची आणि प्रमुख टप्प्यांची तसेच येत्या तिमाहीतील महत्त्वाच्या उद्दिष्टांची (roadmap) माहिती दिली.

या माध्यमातून इतर कमिटींमध्ये काय चालले आहे, याची सर्वांना चांगली कल्पना आली. ही संपूर्ण बैठक माहितीपूर्ण ठरली. शेवटी स्नेहसंमेलनाचे संयोजक श्री. मोहित चिटणीस यांनी तयारीचा एकूण आढावा दिला. नंतरचे प्रश्नोत्तर सत्रही रंगले. बैठकीदरम्यान सर्वांनी नागपुरी तर्री पोहे आणि चहा यांचा आस्वाद घेतला.

स्नेहसंमेलनासंबंधीच्या आपल्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधा. आपण संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती आमच्या समाजमाध्यमांतून बघू शकता. गणेशोत्सवाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा !!!

संकेतस्थळ: bmmseattle2026.org/
Youtube:
www.youtube.com/@BMM2026SEATTLE
फेसबूक: www.facebook.com/bmm2026seattle ;
इंस्टाग्राम: www.instagram.com/bmm2026seattl /
धन्यवाद.

**- अश्विनी क्षीरसागर, BMM2026 समिती**

## भवानी

हे भवानी, भवप्रीता, सत्या, शिवानी, सुंदरा,
प्रथम तुजला वंदिते गे, जुळवुनी दोन्ही करा IIधृII
शौर्य तू अन धैर्य तू
हरसी जगातील क्रौर्य तू
कात्यायनी, तमनाशिनी
जनरक्षिणी, खलदामिनी
तू बनुनी कालरात्री दंडीशी महिषासुरा II१II
प्रथम तुजला वंदिते गे, जुळवुनी दोन्ही करा IIधृII
मोक्ष तू, अन भक्ती तू
अभिव्यक्त जी शिवशक्ती तू
तू अंबिका शुभंकरी
तू शैलजा माहेश्वरी
लोचनी शतसूर्य तुझिया, उजळशी चराचरा II२II
प्रथम तुजला वंदिते गे, जुळवुनी दोन्ही करा IIधृII
ज्ञानदा, सुखदा सदा
दे शांती तू, दे संपदा
जननी तू भवमोचनी
आद्य ऊर्जादायीनी
तव कृपेने भरून वाहे भाग्यलक्ष्मीचा करा II३II
प्रथम तुजला वंदिते गे, जुळवुनी दोन्ही करा IIधृII

**- अनिता म. कांत,** सॅन रमोन, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## बालक पालक उपक्रम

**२०२४ च्या ऑगस्ट महिन्यापासून बालक पालक उपक्रम यशस्वीरीत्या चालू आहे. या उपक्रमाच्या संचालकांपैकी निवी पानवळकर यांच्याशी आम्ही केलेली बातचीत या अंकात सादर करीत आहोत.**

**बालक पालक उपक्रम काय आहे? त्याची सुरुवात कशी झाली?**

**उपक्रम प्रतिनिधी:** आपण भारतातून इथे आलो त्यामागचा एक हेतू तिथली कमालीची स्पर्धा, rat race टाळणे आणि इथे असलेलं स्वातंत्र्य, creativity, वैचारिक स्वातंत्र्य अनुभवणे. पण असं असूनही आपण काही गोष्टी बाबतीत आपण आपली परंपरा आचार विचार अजिबात बदलत नाही म्हणजे इतके मार्क मिळालेच पाहिजेत, हे शिकलेच पाहिजे, इतर मुलं जे करतात तेहि केलंच पाहिजे.

आपल्या मुलांना उत्तर अमेरिकेत वाढवताना, आपल्याला भारतातील मूल्ये जपायची असतात. अमेरिकन संस्कृती आत्मसात करताना, त्यांच्यात भारतीय संस्कृती रुजवण्याचा आपला प्रयत्न असतो. त्याचवेळी, त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करावी अशीही आपली इच्छा असते. तथापि, या सर्वांमध्ये, आपल्याला त्यांची आवड काय आहे आणि त्यांना त्यांच्या करिअरमध्ये पुढे काय करायचे आहे ते ठरवून त्यांना उत्तम मार्गदर्शन मिळवून देणे हे महत्वाचे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आपल्या मुलाच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, त्याला काय जमतंय याची सांगड घालता यायला पाहिजे. बालक पालक हा उपक्रम सुरु करताना तो मुख्यतः पालकांसाठी आहे या विचाराने सुरु करण्यात आला जेणेकरून आंधळेपणाने एकमेकांच अनुकरण करण्याऐवजी सुजाण पालक तयार होतील. सरधोपट मार्ग निवडायचा आग्रह न धरता, आणि आपली इच्छा मुलांवर न लादता आपल्या मुलांची जे करण्याची इच्छा आहे ते ओळखता आलं तर पालक म्हणून आपण त्यासाठी त्यांना मदत करू शकतो. हे करताना आमच्या ज्या चुका झाल्या त्या इतरांकडून होऊ नयेत आणि आमच्या अनुभवातून जे ज्ञान, जी माहिती मिळाली त्याचा इतरांना उपयोग व्हावा हा विचार प्रामुख्याने हा उपक्रम सुरु करण्यामागे होता. पालकांकडून एक सुंदर बालक घडवणे हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू आहे. अशा विचारातून मागच्या ऑगस्ट महिन्यात बालक पालक या उपक्रमाची सुरुवात झाली. मराठी शाळेच्या राहुल देशमुख यांनी या कामात खूप मदत केली. सध्या मी म्हणजे निवी पानवळकर आणि राहुल देशमुख या उपक्रमासाठी काम करतो. आता आमची टीम हळूहळू वाढत आहे लवकरच रश्मी खामकर-साठे यांच्या बरोबरच आणखीन १-२ जण आम्हाला सामील होत आहेत.

**या उपक्रमांतील सत्रांचे स्वरूप काय असते?**

**उपक्रम प्रतिनिधी:** मागच्या वर्षी ऑगस्टमध्ये जेव्हा या उपक्रमाची सुरुवात झाली, तेव्हा पासून बालक पालकचे साधारण दर महिन्याला एक असे पॉडकास्ट होत गेले. ५ ते २२ वर्षातील मुलांच्या पालकांसाठी आणि मुलांसाठी हा उपक्रम आहे. त्यासाठी pre-K and kindergarten पर्यंत मुलांचं संगोपन कसं करावं इथपासून सत्रांची सुरुवात केली. त्यानंतर मुलं मिडलस्कूलमध्ये जातात म्हणून मिडलस्कूलबद्दल सत्र होतं. त्यानंतर हायस्कूल, मग कॉलेजच्या प्रवेशाची तयारी अशी सत्र आत्तापर्यंत झाली आहेत. या नंतर मेडिकल स्कूल, इंजिनियरिंग स्कूल आणि त्यासाठीची तयारी अशी सत्र असतील. या शिवाय personal grooming, health and nutrition, races and triathlon मध्ये भाग घेण्यासाठीची तयारी कशी करावी अशा इतर विषयांबद्दल सत्र आयोजित करायचा विचार आहे. आतापर्यंत झालेल्या सत्रांचे पॉडकास्ट आमच्या व्हॉट्सअप ग्रुपवर आहेत.

**सत्रांचे विषय कसे निवडता?**

**उपक्रम प्रतिनिधी:** मुलं मोठी होताना प्रत्येक टप्प्यावर वेगळे प्रश्न, वेगळी आव्हानं असतात. काय काय प्रश्न असतात आणि त्याबद्दल इतरांना कसं सांगावं याची मी एक यादी केली होती. त्यातूनच कुठल्या गोष्टींना सामोरं जावं लागतं, काय चुकू शकतं किंवा चुकलं तेव्हा त्यातून काय शिकलो असे विषय या सत्रांसाठी निवडले. मी जरी या विषयाचा अभ्यास केला असला तरी या क्षेत्रात काम करणाऱ्या म्हणजे एलिमेंटरी, मिडल आणि हायस्कूल मधे शिकवणाऱ्या शिक्षकांना त्या त्या सत्राला आमंत्रित केलं होतं आणि त्यांच्याबरोबर चर्चा करून सत्रांची आखणी केली. काही वेळा पालकांकडून आलेले प्रश्न किंवा त्यांना कुठल्या विषयाबद्दल ऐकायला आवडेल ते विचारून तसे नवीन सत्रांचे विषय ठरवले जातात.

आता यापुढे आमची नवीन टीम तयार होते आहे त्यातून नवीन विचार पुढे येऊन नवीन किंवा आणखीन जास्त सत्र यापुढे होऊ शकतील.

**या सत्रांबद्दल प्रेक्षकांचा किंवा सत्रात सहभागी असणाऱ्यांचा प्रतिसाद कसा असतो? काही विशेष उदाहरण, अनुभव असतील तर वृत्ताच्या वाचकांसाठी सांगता का?**

**उपक्रम प्रतिनिधी:** अनेकदा पालकांबरोबर त्यांची मुलंसुद्धा आमच्या पॉडकास्टला हजेरी लावतात आणि आम्ही तुमचं पॉडकास्ट ऐकलं/बघितलं असं आवर्जून कळवतात. मी भेटले की किंवा मेसेज पाठवून सांगतात मुलं मला सांगतात कि मी तुझं पॉडकास्ट ऐकलं आणि तू एकदम बरोबर म्हणालीस शाळेत असंच होतं किंवा हायस्कूलमधल्या मुलांनी सांगितलं की college prep चं जे पॉडकास्ट झालं ते मला आवडलं आणि तू अगदी बरोबर सांगितलंस. मुलांकडून अशा प्रतिक्रिया ऐकल्या की खूप छान वाटतं. कधी असंही

होतं की एखादा मुलगा/मुलगी सांगते की पॉडकास्टमधली एखादी गोष्ट मला नाही बरोबर वाटली आणि तेव्हा मी पण त्यांना सांगते कि हा दृष्टिकोन माझ्या लक्षात आला नव्हता. कधी कोणीतरी कुठली पुस्तकं वाचू असं विचारतात तेव्हा त्यांना मी केलेली एक यादीच पाठवते त्यात बरेच इन्स्पिरेशनल सिनेमे किंवा पुस्तके जे बघण्या किंवा वाचण्यासारखे आहेत ते नमूद केले आहेत. असे मुलांकडूनच किंवा पालकांकडून प्रश्न आणि प्रतिक्रिया आल्याने पुढचा मार्ग दिसायला लागला.

**यापुढे तुमच्या काही नवीन योजना आहेत का? काही स्थानिक कार्यक्रम किंवा अधिवेशनात काही खास कार्यक्रमांच आयोजन वगैरे त्याबद्दलची माहिती?**


**उपक्रम प्रतिनिधी:** हा उपक्रम अजून नवीन आहे आणि आमची टीम अजून पूर्ण तयार होत आहे. आमचे पॉडकास्ट आणि हा उपक्रम लोकांना असाच आवडत राहिला तर कदाचित अधिवेशनात एखादा कार्यक्रम करण्याचा विचार करू.

**बालक पालक उपक्रमाची तुम्ही अगदी छान माहिती दिलीत. तुम्ही इतक्या तळमळीने हा उपक्रम सुरु केला, चालवला आणि आता वाढवत आहात त्याबद्दल तुमचे बृ. म. म. वृत्तातर्फे आभार आणि अभिनंदन. तसेच, या उपक्रमाच्या पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.**

More information and link to join Balak Palak Whatsapp group:

https://chat.whatsapp.com/D6tQ1rqPGSDL4qSpRjradz?mode=ems_copy_c

- वृत्त समिती




## लक्ष्यवेधी



- **ऋत्विक साठे**

Currently in US Air Force (1st Lieutenant)

मूळचा ॲटलांटाचा ऋत्विक सध्या US Air Force मधे 1st Lieutenant म्हणून कार्यरत आहे.

आपला मराठी झेंडा US Air Force मध्ये घेऊन जाणारा, ऋत्विक elimination करत जात आपल्या उत्तरापर्यंत कसं पोहोचायंच, आपला back up plan का तयार असावा असं बरंच काही छान सांगायला 'लक्ष्यवेधी' च्या तृतीय सत्रात आपल्याला भेटायला आला आहे.

त्याच्या या महत्वाकांक्षी प्रवासाचा आढावा घेतला आहे, श्वेता चक्रदेव यांनी.

ही मुलाखत सर्वांना आवडेल आणि नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

लिंक: www.youtube.com/watch?v=iPEYNo_y_NU

तुमच्या ओळखीचेही जर कोणी सैन्यात, सरकारी विभागात, पोलिसात, किंवा नेहमी ना ऐकलेल्या नव्या रस्त्यावर चालू पाहणारे असतील तर आम्हाला नक्की कळवा. आम्ही त्यांच्याशीही जरूर संवाद साधू.

## अर्थमंथन:
## ऑप्शन्स का महत्त्वाचे आहेत?




फक्त शेअर खरेदी करण्यापेक्षा ऑप्शन्स ही एक प्रभावी गुंतवणुकीची पद्धत आहे. बहुतांश लोक गुंतवणूक करून पैसे कमवू इच्छितात, परंतु तेवढेच महत्त्वाचे म्हणजे आपल्या पैशांचे संरक्षण करणे. ऑप्शन्समुळे आपण दोन्ही – कमाई आणि संरक्षण – करू शकतो.

उदा. Cash-Secured PUT Option विकून आपण उत्पन्न मिळवू शकतो किंवा शेअर सवलतीत खरेदी करू शकतो.

या प्रकारच्या रणनीती विशेषतः NVDA (NVIDIA) सारख्या स्थिर व सुप्रसिद्ध कंपन्यांसाठी उपयोगी पडतात.

Cash-Secured PUT Option (कमाई किंवा सवलतीत खरेदी)

**पायरी 1: NVDA निवडा आणि टार्गेट प्राईस ठरवा**

समजा आपण पुढील ३ महिन्यांत प्रति शेअर $150 या दराने खरेदी करण्याची योजना आखली आहे. लगेच खरेदी करण्याऐवजी आपण असे करू शकता:

- $150 NOV PUT Option विकावा आणि त्याबदल्यात प्रति शेअर $5 प्रीमियम घ्यावा.
- एक कॉन्ट्रॅक्ट = 100 शेअर्स, त्यामुळे: $5 × 100 = $500 लगेच मिळतात.

**परिस्थिती A: NVDA $150 पेक्षा वर राहिला (Nov Expiry पर्यंत)**

- PUT Option निष्फळ ठरतो.
- तुम्ही $500 प्रीमियम ठेवता.
- म्हणजे शेअर न घेताही तुम्ही कमाई करता.

**परिस्थिती B: NVDA $150 किंवा त्याखाली गेला (Expiry आधी)**

- तुम्हाला 100 शेअर्स $150 ला घ्यावे लागतील = एकूण $15,000.
- पण आधीच $500 मिळाल्यामुळे तुमचा प्रत्यक्ष खर्च = $14,500 → म्हणजे $145 प्रति शेअर.

**रणनीती 2: Covered Call (आपल्या शेअर्सवरून उत्पन्न)**

एकदा NVDA चे शेअर्स घेतले की, आपण सतत कमाईसाठी Covered Call Options विकू शकतो.

**पायरी 2: Covered Call विकणे**

समजा NVDA $170 ला ट्रेड होत आहे आणि तुमच्याकडे 100 शेअर्स आहेत (मूल्य = $17,000).

- तुम्ही $210 Strike Price असलेला, नोव्हेंबर 2025 मध्ये संपणारा Covered Call विकू शकता.
- प्रति शेअर $6 प्रीमियम मिळेल.
- म्हणजे $6 × 100 = $600 उत्पन्न लगेच मिळते.

**NVDA $210 च्या खाली राहिला**

- Call निष्फळ ठरेल.
- तुम्ही $600 आणि तुमचे शेअर्स – दोन्ही ठेवता.

**NVDA $210 पेक्षा वर गेला**

- तुम्हाला 100 शेअर्स $210 ला विकावे लागतील = $21,000.
- प्रीमियम मिळून तुमचा एकूण फायदा:

| Calculation | रक्कम ($) | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| 210 – 170 = 40 $ × 100 शेअर्स | 4000$ | शेअर विक्रीतून मिळालेला एकूण नफा |
| Option Premium वाढ (600 → 1200) | -1200$ | बाजारातील अस्थिरतेमुळे वाढलेला प्रीमियम खर्च. |
| Final Profit | 2800$ | सर्व खर्च वजा केल्यानंतरचा अंतिम नफा |

**अनुभव आणि कृतज्ञता :** मी 2020 पासून ऑप्शन ट्रेडिंग मोफत शिकवत आहे. माझे मार्गदर्शक डॉ. विष्णू रामचंद्र पारनेरकर महाराज यांच्या आशीर्वादाने मला हे ज्ञान वाटता आले.

BMM ने मला उत्तर अमेरिकेतील मराठी परिवारासमोर बोलण्याची संधी दिली, यासाठी मी त्यांचा आभारी आहे.

**शेवटचे विचार:** ऑप्शन्स फक्त सट्टा लावण्यासाठी नाहीत – ते बुद्धिमान साधन आहेत ज्यामुळे आपण कमाई करू शकतो, गुंतवणुकीचे संरक्षण करू शकतो आणि आपला खर्च व्यवस्थित कमी करू शकतो.

Cash-Secured PUT आणि Covered Call सारख्या शिस्तबद्ध पद्धती वापरून तुम्ही एक मजबूत आणि हुशार गुंतवणूक धोरण तयार करू शकता.

This article is intended for educational purposes only and should not be considered financial advice. Please consult with a registered and certified financial advisor before making any investment decisions.

- **किरणकुमार लोखंडे.** कोलंबस, ओहायो

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## उत्तररंग




BMM उत्तररंगाच्या Father's Day निमित्ताने सादर झालेल्या "लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रे" या विशेष कार्येक्रमात काही उत्तररंगीयानी आपल्या वडिलांच्या आठवणी सादर केल्या. त्यातीलच काही आठवणी येत्या काही महिन्यात वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

### माझे वडील, एक असाधारण व्यक्तिमत्व :
### कै. वसंत बळवंत अरगडे

कॉलेजात असताना आम्ही भावंडं रात्री उशिरापर्यंत गप्पा मारत बसायचो, मध्यरात्र झाली की, वडील ओरडायचे, बेशरम, बेछूट, बेताल, बेअकली, बेजबाबदार, वगैरे, वगैरे. आम्ही त्याला 'बे'चा पाढा म्हणायचो आणि निर्लज्जपणे खिदळायचो. तरुणपणाचा उर्मटपणा, दुसरं काय?

आम्ही जर वडिलांचं ऐकलं नाही, तर त्यांचं एक ब्रीदवाक्य होतं – 'पालथ्या घड्यावर पाणी.' माझं कॉलेज संपत आल्यावर माझा घडा सरळ झाला.

माझे वडील महाराष्ट्राच्या शिक्षण खात्यातून ५८व्या वर्षी निवृत्त झाले आणि तब्बल ४४ वर्षं पेन्शन उपभोगून वयाच्या १०२व्या वर्षी गेले. नोकरी करतांना त्यांनी शिक्षण आणि नवसाक्षर प्रौढ यांसाठी पुस्तकं लिहिली. 'पांडुरंग पावला' या त्यांच्या पुस्तकाला राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळाला आणि, 'उद्याची शाळा' हे पुस्तक वॉशिंटन डी.सी. इथल्या 'लायब्ररी ऑफ काँग्रेस' मध्ये आहे.

निवृत्तिनंतर त्यांनी स्वतःसाठी एक नवं आयुष्य शोधले. ते नीरा नरसिंहपूर येथील नृसिंह मंदिराचे अठरा वर्ष प्रमुख विश्वस्थ होते. त्यांनी मंदिराचा अनेक प्रकारे कायापालट केला. नृसिंह कोषाचे तीन खंड प्रसिद्ध केले.

माझे वडील वृद्धत्वामुळे गेले. त्यांना कुठलाही आजार नव्हता. यामागचं रहस्य म्हणजे वक्तशीरपणा, योग, प्राणायाम, संयम आणि समृद्ध सामाजिक जीवन. दुर्देवाने ८९व्या वर्षी रस्ता ओलांडताना त्यांना मोटरसायकलने धडक मारल्याने त्यांचे दोन्ही पाय मोडले. तेरा वर्षं ते अपंग होते, पण त्यांच्या दिनक्रमात खंड पडला नाही. दररोज सकाळी आंघोळ करून पूजा करायचे. कॉटवर बसून दिवसभर लिहायचे.

अशा अवस्थेत त्यांनी खूप काम केलं. रामदासांचे मनाचे श्लोक, करुणाष्टकं, तसेच रामरक्षा, गणपती अथर्वशीर्ष यांचं इंग्रजीमध्ये भाषांतर केलं. वयाच्या ९८व्या वर्षी संत रामदासांच्या दासबोधाचा इंग्रजी अनुवाद सुरू करून १८ महिन्यांत तो पूर्ण केला. ते नेहमी म्हणायचे, "मी हे काम करावं म्हणून देवाने माझे पाय मोडले. नाहीतर गावभर भटकत बसलो असतो."

त्यांना टापटिपीची आवड होती. संध्याकाळी व्हीलचेअरवरून फिरायला जातानासुद्धा ते कडक इस्त्रीचे कपडे घालायचे.

संस्कृत आणि इंग्रजीवर त्यांचं प्रभुत्व होतं. दोन वेळा सहा महिन्यांसाठी ते आणि माझी आई अमेरिकेत आले, तेव्हा मला त्यांचा जाणता सहवास मिळाला. त्यांनी मला वर्डस्वर्थ, टेनिसन वगैरे कवींच्या कविता आणि शेक्सपिअरच्या नाटकांचं सौंदर्य समजावून सांगितलं. अनेक संस्कृत कादंबऱ्या आणि नाटकातल्या गंमती जमती सांगितल्या. बाणभट्ट या लेखकाच्या 'कादंबरी' नावाच्या कादंबरीची सुरुवात शुद्रक नावाच्या राजाच्या वर्णनाने सुरू होते; ते वाक्य एक पानभर आहे. तशी अनेक वाक्यं, सुभाषितं, कविता, आणि स्तोत्रं वडिलांना मुखोद्गत होती. शेवटपर्यंत त्यांची बुद्धी कुशाग्र होती. या जगाचा निरोप घेण्याच्या दहा दिवस आधी, १०२व्या वर्षी, त्यांनी मला गीतेचा पंधरावा अध्याय पूर्ण म्हणून दाखवला.

त्यांना कुठलंही व्यसन नव्हतं. त्यांच्या तोंडून मी कधीही शिव्या ऐकल्या नाहीत. प्रामाणिकपणा, स्वयं-शिस्त, नेमस्तपणा हे गुण मी त्यांच्याकडून शिकलो. आर्थिक परिस्थिती नसतानाही त्यांनी द्रष्टेपणाने माझ्या दोन मोठ्या भावांना आणि दोन मोठ्या बहिणींना उच्च शिक्षण दिलं, तेही मित्रांकडून वारंवार पैसे उसने घेऊन.
त्यांचं मित्रमंडळ मोठं होत. अमेरिकेत मला टीचिंग फेलोशिप मिळाली होती, पण विमानप्रवासाला आणि पहिल्या महिन्याच्या खर्चाला आमच्याकडे पैसे नव्हते. त्यांचे दोन मित्र कोणतेही आढेवेढे न घेता माझ्या कर्जाला जामीन राहिले. त्याशिवाय माझं आयुष्य पूर्ण बदललं असतं.

माझे वडीलही शेवटी एक माणूसच होते. प्रत्येकात गुण-दोष असतातच. त्यांच्या उणिवा पाहून आणि काळाप्रमाणे बदलणारी जाणीव यातून मी अनेक गोष्टी शिकलो. माझ्या बायकोने रसायन शास्त्रात पीएच.डी. करावी आणि शास्त्रज्ञाची नोकरी करावी यासाठी मी उत्तेजन दिले. सर्व आर्थिक व्यवहार आम्ही सहविचाराने करतो.

माझ्या आई-वडिलांनी त्यांच्या मृत्युपत्रात त्यांच्या मालमत्तेचा एक मोठा भाग दान देण्यासाठी ठेवला आणि आम्ही ती इच्छा पूर्ण केली. किती मोठा आदर्श आहे आम्हाला!

माझ्या वडिलांनी सांगितलेल्या सुभाषिताने मी ही आदरांजली पूर्ण करतो -

**धनानि भूमौ, पशवश्च गोष्ठे ।**
**भार्या गृहद्वारी, जनः स्मशाने ।**
**देह: चितायां, परलोकमार्गे कर्मानुगच्छति जीव एक:||**

घरातला पुरुष गेल्याचं वर्णन आहे हे.
त्याचं धन जमिनीतच पुरलेलं राहतं. त्याची गुरं गोठ्यातच राहतात.
बायको घराच्या दारापर्यंतच निरोप द्यायला येते. आप्तस्वकीय स्मशानापर्यंतच येतात.
त्याचा देह चितेपर्यंतच त्याच्याबरोबर असतो.
पुढच्या परलोक प्रवासात मात्र त्याचं कर्म तेवढं त्याच्या सोबत असतं.

जन्मभरच्या सत्कर्माने माझ्या वडिलांना सद्गती मिळाली आहे, अशी मला खात्री आहे. धन्यवाद.

- **प्रमोद वसंत अरगडे,** सॅन डिएगो

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## लई अवघड आहे गड्या

माझं नाव रवि गावकर. मी नेपरव्हिल, इलिनॉयमधे राहातो. माझं भारतातल जन्मगाव ओपा, हे गोव्यातलं छोटंस खेडेगाव. अगदी डोंगराळ भागात वसलेलं. फोंडा या मध्यवर्ती बाजाराच्या शहरापासून ५ मैल आणि पणजीपासून साधारण १५ मैल.

आम्ही गोव्यातील कऱ्हाडे ब्राह्मण. गोव्यात आम्हाला भट म्हणतात. वडील बागाईतदार. आम्ही त्यांना मामा म्हणायचो. आम्ही एकंदर सहा भावंडं, एक विधवा आत्या आणि एक गडी कामासाठी ठेवलेला. अशी एकंदर दहा माणसं. घराभोवती सुमारे ८-१० एकर जमीन. त्यात सुपारी, केळी, काजू, फणस, आंबे अशा झाडांची लागवड. शिवाय उन्हाळ्यात विड्याच्या पानांची पण उत्पनात भर पडे. ही पिकं आठवड्यातून दोनदा फोंड्याच्या बाजारात नेऊन विकायची. या सर्व उत्पन्नावरच कुटुंबाचा चरितार्थ चाले.

बागाईतदारांचं काम खूप कष्टाचं आणि कधीही न संपणारं असतं. त्यामुळे आम्ही घरातील सर्व माणसं काही ना काही कामांत गुंतलेलो असायचो. तशीच मामांची शिकवण आणि दरारा. मामांची उंची मध्यम. रंग निमगोरा. परंतु एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व. आम्हा मुलांशी खूप बोलण नसल तरी मित्रमंडळीशी ते गप्पात रंगत. घरात ते साधा पंचा नेसत. फोंड्याला जातांना धोतर, शर्ट, त्यावर काळा कोट आणि काळी टोपी असा त्यांचा पेहराव असे. फोंड्यातील सर्व व्यापारी त्यांना विनायकभट अशा आदरार्थी नावानं संबोधत. ज्यावेळी त्यांच्याऐवजी आम्ही बाजारात जाऊ लागलो त्यावेळी त्यानी आम्हा मुलांना सांगून ठेवल होतं: “काही जिन्नस उधार घेण्याचा प्रसंग आला तर तुम्ही त्या दुकानदाराला फक्त “हांव विनायेकभटाचो चलॉ” एवढच सांगितल की ते तुम्हाला वस्तू उधार देतील!” केवढा अभिमान आणि आत्मविश्वास! मामांचं लग्न ते केवळ १३ वर्षांचे असताना झालं. त्यांचे आईवडील पण लवकरच वारले. त्यामुळे तेच घरातले एकुलते एक पुरुष राहिले. साहजिकच संसाराची सर्व जबाबदारी त्यांच्यावरच पडली. त्यामुळे त्यांनी पुढे जे काही कमावलं ते केवळ स्वत:चे कष्ट, आणि जिद्दीच्या बळावरच.

त्यावेळी गोव्यात पोर्तुगीज सत्ता होती. त्यामुळे सरकारी कामकाज पोर्तुगीजमधे चाले. त्या कामांसाठी उपयोगी येईल एवढा पोर्तुगीज भाषेतील शब्दसंग्रह त्यांच्याकडे होता. तेवढ्याच आधारावर त्यांनी आयुष्यभरात वडिलोपार्जित मिळालेल्या जमिनीत अनेकपटीने भर घातली! आम्हा मुलांचं शिक्षण केलं.

मामांचं जीवन अगदी शिस्तबद्ध होतं. ठरलेल्या वेळी ठराविक कामं झालीच पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असे. आणि आम्ही त्याच शिस्तीत वागावं अशी त्यांची अपेक्षा असे. आणि ती शिस्त मोडल्यास त्यांच्या नुसत्या चढलेल्या आवाजानेच आम्हाला धडकी भरे. परंतु आम्हा कुणाही भावंडांवर त्यांनी कधी हात उगारलेला मला माहीत नाही!

त्यांच स्वत:चं शालेय शिक्षण झालेलं नसलं तरी आम्ही सर्व भावंडांनी शिकावं ही त्यांची तळमळ. म्हणूनच त्यांनी आम्हा सहाही भावंडांची, ओपात शाळा नसली तरी, सहा मैलांवर असलेल्या एका आत्याकडे शिक्षणाची व्यवस्था केली. फक्त “मराठी चौथीपर्यंत शिक्षण खूप झालं. शेवटी बागायतीत तर काम करायचय. मी कधी शाळेतही गेलो नाही तरीही संसार केलाच की! आणि तुम्हाला काही कमी पण पडू दिलंय का?” हे ते बोलून जात. तरीसुद्धा मराठी सातवी पूर्ण करून मी ज्यावेळी शिक्षणासाठी गोव्याबाहेर जातोय हे त्यांना कळलं त्यावेळी त्यांचा विरोध त्यांनी माझ्याशी मौन पाळून दाखवला! अखेर मी जेव्हा एसेस्सी परीक्षेत बोर्डात चौथा आलो आणि फोंड्यातील त्यांच्या एका मित्राने पेढे वाटायला सुरुवात केली त्यावेळी त्यांना काय आनंद झाला असेल याची कल्पनाच करवत नाही!

लहानपणी आत्याकडे असताना मला आणि माझ्या धाकट्या भावाला टायफॉइड झाला होता. त्यावेळी मामा आमची काळजी

घेण्यासाठी दर आठवड्याला एकदा अशी ती १२ मैलांची पायपीट दोन महिने करत होते!


अखेर वयाच्या ८२व्या वर्षी त्यांना अचानक प्रॉस्टेट कॅन्सरचं निदान झालं. कॅन्सर तिसऱ्या स्टेजला पोचलेला होता! मी अमेरिकेतून लगेचच तीन आठवड्यांची सुट्टी घेऊन घरी गेलो. काही दिवस त्यांच्याबरोबर घालवता आले. अल्पशी का होईना त्यांची सुश्रूषा करण्याची संधी मिळाली. माझी सुट्टी संपत आलेली होती. आणि त्यांची हळूहळू स्मृती जात चालली होती. मी अखेर घरून निघायच्या अगोदर त्यांच्या शेजारी जाऊन बसलो. त्यांनी माझा हात हातात घेतला आणि मला म्हणाले, “रंगनाथ, तू मला फोंड्याला तुझ्या हॉस्पिटलमधे घेऊन जा. मी बरा होईन.” मी त्यांना कितीतरी सांगायचा प्रयत्न केला की “मी डॉक्टर नाही, इंजिनिअर आहे”. परंतु ते त्यांना पटेचना. आम्हा चार मुलांपैकी एकाने तरी डॉक्टर व्हावे अशी त्यांची खूप इच्छा होती. [ती काही आम्ही पूर्ण करू शकलो नाही. परंतु त्यांचे दोन नातू आज डॉक्टर आहेत.]

अखेर मन घट्ट करून मी माझा हात सोडवून घेतला आणि घरच्या सर्वांचा निरोप घेऊन परतीच्या प्रवासाला निघालो. मनात फक्त एकच विचार. मामा आता परत भेटणार का?

त्यानंतर दोनच आठवड्यात घरून पत्र आलं...मामा आता आपल्यात नाहीत! शेवटच्या क्षणीं त्यांनी फक्त एक पाण्याचा घोट घेतला आणि डोळे मिटले ते कायमचेच!
त्यावेळी एक डॉक्टर नातू मामांच्या उशीशी उभा होता.

- **रवि गावकर**, नेपरव्हिल, इलिनॉय

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## मराठी शाळा - निबंध स्पर्धा

BMM मराठी शाळा

मराठी शाळेतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतल्या निबंधापैकी निवडक ६ निबंध प्रत्येक महिन्यात १ हयाप्रमाणे, स्पर्धेसाठी जसे पाठवले गेले आहेत तसे, वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

### निबंध ६
### प्रवासाचे महत्त्व आणि माझा आवडता प्रवास

का 'प्रवास' म्हणतो टप्पा हा शेवटचा वर्तुळात फिरतो कोष मध्यबिंदूचा.. प्रारंभ नसे ना शेवट त्या रेषेला प्रश्नातच असते उत्तर ज्याचे त्याला!

'प्रवास' या संकल्पनेचं रॉय किणीकरांनी या ओळींमध्ये अतिशय सुंदर वर्णन केलेलं आहे. प्रत्येकाच्या आपल्या आयुष्याच्या निराळ्या व्याख्या असतात, तसं मला आयुष्य म्हणजे "आले आहे अदृश्यातून, जाणार आहे अदृश्यात" असा प्रवास वाटतं, आणि हाच माझा आवडता प्रवास आहे!

कोवळ्या वयात मनाची समजूत असते, विशिष्ट टप्पा गाठला, एखादं यशाचं शिखर सर केलं, की प्रवास संपला. मग तिथं पळभर विसावा घेतोय, तोच साद येते "चला जाऊ द्या पुढे काफिला, अजुनी नाही मार्ग संपला". आणि मग जशी पुढं पावलं पडत जातात, तसा आपल्या अनुभवांचा, ऊर्जेचा आणि शोधाचा मिलाफ असणारा नवा प्रवास उलगडत जातो.

कसा असतो हा प्रवास? कधी काळोख, तर कधी प्रकाश, कधी दुर्गम घाट, तर कधी हिरवी पाऊलवाट असे अनेक अनुभव. आणि 'अनुभव' म्हणजे तरी काय? तर सामोऱ्या येणाऱ्या क्षणाला स्वतःची भावुकता जोडणं आणि ती संवेदना कधी अनुभव म्हणून, तर कधी जाणिवेच्या पलीकडची नेणीव म्हणून गाठीशी बांधून घेणं! अशी जाणिवेची आणि नेणिवेची शिदोरी प्रवासाला समृद्ध करत राहते.

माझ्या आयुष्याच्या प्रवासाकडे बघताना या प्रवासाची इंद्रधनुषी रूपं मनात रुंजी घालायला लागतात.. विश्वाच्या व्यापकपणाची उमज नसलेलं निरागस बालपण सरलं. मग तारुण्याच्या तरल संवेदना, शिक्षण, व्यवसाय यांनी व्यापलेली उमेदीची वर्ष आली. पुढच्या सुंदर वळणावर जोडीदाराचा हात हातात आल्यावर या प्रवासात एक हक्काचा सहप्रवासी मिळाला! आणि मग एका

अलवार टप्प्यावर आई झाले आणि नवीन जबाबदाऱ्यांसोबतच नवीन उर्मी सुद्धा आली.. आणि माझा आई म्हणून नव्याने झालेला जन्म हे या प्रवासामधलं सोनेरी वळण ठरलं!

आणि या भौतिक प्रवासासोबतच अंतर्मनाचा आणि आत्म्याचा सुद्धा एक समांतर प्रवास सुरू आहे. "आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः। यद्यद्वै तद्वेदान्नित्यम्।" असं आपल्या उपनिषदांमध्ये सांगितल्याप्रमाणं आल्याचा साक्षात्कार हा अनुभूती मधून होतो. अनुभूती ही अनुभवांमधून मिळते. आणि अनुभव हे एका ठिकाणी थांबून राहून नव्हे, तर वाहते आणि प्रवासी राहून मिळतात. त्यामुळं चोखंदळ मार्ग निवडणं, धाडसी पावलं उचलणं, जगातल्या कानाकोपऱ्यांना भेटी देणं, नवीन माणसांच्या सहवासात येणं या सगळ्या गोष्टी प्रवासामुळेच शक्य होतात. मुशाफिरीच्या प्रत्येक वळणावर ज्ञानाचा नवा खजिना आपली वाट पाहत असतो.

माझ्या या आवडत्या प्रवासात, सदैव सोबत असणाऱ्या कुटुंबाच्या जिव्हाळ्यानं पायांना बळ, आणि मनाला ऊब दिली आहे आणि या जगण्यावर शतदा प्रेम करण्याची प्रेरणा दिली आहे. वाटेवर भेटत राहणाऱ्या जिवलग मित्रांनी अनेकविध रंग चढवले आहेत. शिक्षक आणि मार्गदर्शकांनी प्रवासाची दिशा दाखवली आहे. एखाद्या उत्तुंग शिखरावर यशाची चव चाखायला मिळते आहे, तर अपेक्षाभंगाच्या उतारावर शिकवण आणि दृष्टीकोन मिळतायत. एकूण काय, तर हा प्रवास नेहमी काहीतरी देतो च आहे, मला घडवतो आहे!

तर असं हे आयुष्य म्हणजे 'मुक्काम' नसून, निरंतर शोधाचा 'प्रवास' आहे, हे उमगलंय आता.. त्यामुळे या प्रवासाची, पर्यायाने 'जीवनप्रवासा'ची अभिलाषा आणि चेतना सदैव जागृत आहे! सुधीर मोघ्यांनी शब्दांमध्ये मांडून ठेवलेलंच आहे..

क्षितिज नवे आणि नवे गगनही नवे बळ मिळे पंखानाही.. पुन्हा नव्याने लागे बहरू स्वप्नांचा ताटवा नवा डाव चल मांडायला, मना नव्या गावा !!

\- मृण्मयी इनामदार

**राशिभविष्य : सप्टेंबर २०२५**

**"या महिन्यात चंद्रग्रहण ७ सप्टेंबर आणि सूर्यग्रहण २१ सप्टेंबरला आहेत. काहींना त्रासदायक ठरू शकतात."**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## नाफा मराठी चित्रपट महोत्सव २०२५ उत्साहात आणि जल्लोषात संपन्न!

**अमेरिकेतील मराठी प्रेक्षकांनी साजरा केला एक सांस्कृतिक सोहळा!**

नमस्कार मंडळी, मराठी संस्कृतीचा उत्सव, अभिमान आणि कलाविष्काराचे अविस्मरणीय दृश्य म्हणजे नाफा मराठी चित्रपट महोत्सव २०२५!




नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष अभिजित घोलप प्रस्तुत नाफा फिल्म फेस्टिवलचा हा सलग दुसऱ्या वर्षीचा दिमाखदार सोहळा नुकताच सॅन होजे, कॅलिफोर्निया येथे जुलै मध्ये संपन्न झाला.

सॅन होजे येथील भव्य अशा 'द कॅलिफोर्निया थिएटर'मध्ये तीन दिवस रंगलेल्या या महोत्सवात तब्बल अडीच हजारांहून अधिक मराठी प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. या चित्रपट महोत्सवासाठी नाफाने बृहन्महाराष्ट्र मंडळाबरोबर विशेष भागीदारी केली होती. अशा प्रकारची भागीदारी करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. बृहन्महाराष्ट्र मंडळाने नाफाला उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी मंडळांपर्यंत पोहोचण्यास मदत केली. या कार्यक्रमाच्या यशासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाने केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानू इच्छितो.

**रेड कार्पेट, पुरस्कार, आणि सन्माननीय उपस्थितीने सजलेली सुरुवात:** भव्य रेड कार्पेटपासून सुरू झालेल्या या महोत्सवात विविध



पुरस्कार सोहळ्यांनी रंगत आणली. ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांना "नाफा जीवनगौरव पुरस्कार" प्रदान करण्यात आला. डॉ. मोहन आगाशे यांना महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री

ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते “चित्रमहर्षी” पुरस्काराने गौरवण्यात आले तर सचिन खेडेकर, मधुर भांडारकर, सोनाली कुलकर्णी, अश्विनी भावे, अवधूत गुप्ते, स्वप्नील जोशी, वैदेही परशुरामी, आदिनाथ कोठारे अशा अनेक दिग्गज कलावंतांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

**कलात्मक चर्चा, अनुभवांची देवाणघेवाण:** अभिनेते सचिन खेडेकर यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषणाने महोत्सवाची सुरवात झाली. त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीतील सध्याच्या परिस्थितीचा सखोल आढावाघेतला आणि नाफासारख्या उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

**प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण:** ‘संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई’, ‘स्नोफ्लॉवर’, रावसाहेब, छबिला यासारखे दर्जेदार चित्रपट महोत्सवात दाखवले गेले. नाफाच्या तीन शॉर्ट फिल्म्सचे स्क्रीनिंग ही करण्यात आले. तसेच, शॉर्टफिल्म कॉम्पिटिशनमधून निवड झालेल्या, छोट्या पडद्यावर मोठा प्रभाव टाकणाऱ्या शॉर्टफिल्म्सच्या विविध विभागांतील विजेत्यांना पुरस्कार देऊन प्रोत्साहन दिले गेले.

डॉ. मोहन आगाशे, सचिन खेडेकर, मधुर भांडारकर, डॉ. पराग हवालदार, सोनाली कुलकर्णी, अश्विनी भावे, अवधूत गुप्ते, स्वप्नील जोशी, वैदेही परशुरामी, आदिनाथ कोठारे यांनी चित्रपटनिर्मिती, अभिनय अशा विविध विषयांवर घेतलेल्या कार्यशाळेतून शिकण्याची, तसेच 'मीट अँड ग्रीट' च्या माध्यमातून त्यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधीही उपस्थितांना मिळाली.

प्रसाद फणसे आणि रोहन फणसे यांनी घेतलेले डबिंग विषयीचे वर्कशॉप्स हे महोत्सवाचे अजून एक आकर्षण ठरले.

महोत्सवाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे अमोल पालेकर यांच्या ऐवज’ आणि ‘Viewfinder’ या आत्मचरित्राचे प्रकाशन!!

**गौरवाचे क्षण:** अमेरिकन काँग्रेसने नाफाला दिलेलं सन्मानपत्र खास मंचावर श्री. ठाणेदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलं, ज्याने नाफाच्या कार्याला एक नवी ओळख मिळवून दिली.

**सखोल चर्चा आणि भविष्यदृष्टी:** "मराठी सिनेमा – वर्तमान, भवितव्य आणि वाटचाल" या विषयावर घेतलेल्या पॅनल डिस्कशनमध्ये अनेक दिग्गज कलाकार आणि दिग्दर्शकांनी आपली मतं मांडली.

**समारोप – पण नव्या वाटचालीचा प्रारंभ:** संस्थापक अध्यक्ष अभिजीत घोलप यांनी पुढील वर्षी नाफाला आणखी देशांमध्ये घेऊन जाण्याचा संकल्प व्यक्त केला. नव्या प्रयोगांची घोषणा करत, नाफाचा हा महोत्सव केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम न राहता, एक जागतिक चळवळ होण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचं स्पष्ट केलं.




मराठी चित्रपटसृष्टीच्या प्रेमात असाल, तर ‘नाफा’सोबत जोडलंच पाहिजे! मराठी माणसाच्या कलेचा, भावनेचा आणि अस्मितेचा जागतिक ठसा उमटवणाऱ्या‘नाफा’मध्ये सहभागी व्हा. वर्षभर चालणाऱ्या विविध कार्यक्रम, शॉर्ट फिल्म निर्मिती, मास्टरक्लासेस, इंटरनॅशनल स्क्रीनींग्स याचा भाग व्हा.

आजच नाफा सदस्य व्हा – आपल्या मराठीपणाच्या अभिमानासाठी!

आमच्यासोबत रहा, आमच्या आगामी उपक्रमांची माहिती मिळवत राहा आणि मराठी सृजनतेचा भाग बना!

northamericanfilmassociation.org

- **प्रतिनिधी, सॅन होजे**



## स्त्री शक्ती - एक खोल गूढ

मी सकाळचा चहा घेतच होते की मानसी, माझी मैत्रीण, अगदी घाई घाईने येऊन माझ्या पुढ्यातच येऊन उभी राहिली. अगं काय झाले असे म्हणता पिशवीतून एक मोठा चषक काढून माझ्या पुढ्यात ठेवला. काय गं हे, असे म्हणता, म्हणाली कशी, अगं चक्कपैकी सरकारने माझ्या कामाचा गौरव करत हे दिले आहे. परत मला सरकारी शाळेमधून व्यावसायिक शिक्षणाचे वर्ग घ्यायला सांगितले आहे. ऐकून खूपच छान वाटत होते. मानसी होतीच तशी धडाडीची. ती सेवाभावी संस्था चालवत होती. त्या संस्थेद्वारे ती आदिवासी भागात मुलांसाठी शाळा चालवत होती. तसेच हातमागावरच्या बऱ्याचशया वस्तू ती याच आदिवासी लोकांकडून करून घेऊन त्यांना स्वयंपूर्ण करत होती. तसेच बऱ्याच योजना पर्यावरणाला अनुकूल म्हणून राबवत होती. तिचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. मानसी खरचं कौतुक आहे तुझे, असे म्हणत, मी म्हणाले या रविवारी वेळ आहे का आपल्या सगळ्या मित्र मैत्रिणिंना बोलावते, तुझा सत्कार छान साजरा करू या. मानसी हो म्हणून अजून बरीच कामे आहेत म्हणत निघाली.

मी पण मग आवरून माझ्या क्लिनीकला निघाले. थोडा उशीरच झाला होता आज, पेशंटची गर्दी दिसत होती. त्यात एक मध्यमवर्गीय बाई, तिच्या चेहऱ्यावरून अगदीच गरीब स्वभावाची वाटत होती. तिच्या १-२ वर्षाच्या मुलीला खांद्यावर घेऊन अगदी काळजीने अत्यवस्थ दिसत होती. नर्सला मी त्या बाईला पहिले आत तपासायला आणायला सांगितले. तपासाअंती कळाले की लहान मुलगी खुपच अनिमिक झाली होती. एक दिवस तरी पूर्ण निरीक्षणाखाली ठेवायला लागणार होते. लगेचच तिच्यावर उपचार सुरू केले. तिच्या आईला समजावून सांगितले काय झाले ते, का एक दिवस रहावे लागणार आहे. मी नंतर क्लिनीक सोडण्याअगोदर मुलीला बघण्यासाठी हॉस्पिटल वॉर्ड मध्ये गेले. तिला शांतपणे झोप लागली होती. आई तर तिच्या शेजारीच बसली होती. सगळे नीट चालले आहे हे पाहून मग मी पण निघाले. दुसऱ्यादिवशी आल्याआल्या मी हॉस्पिटल वॉर्ड मध्ये गेले तर जाताजाता वाटेत नर्स भेटली, म्हणते कशी, डॉक्टर तुम्ही त्या मुलीला पाहायला चालला आहेत का? ती आता खूपच बरी आहे, उठली आहे आणि तिच्या खेळण्यांची खेळत आहे. तिची आई मलाच आठवण करून देत होती औषध घ्यायची वेळ झाली, सलाईन बालदायची वेळ झाली असे. आईच शेवटी तिला कसं काही सुचणार, मूल आजारी असल तर, आईचच काळीज ते.

नंतर बाकीचा दिवस कसा गेला ते कळलेच नाही. संध्याकाळी घरी जाताना वाटेत बरीच गर्दी दिसत होती म्हणून मग कारमधूनच बाजूच्या पानवाल्याला विचारले कसली गर्दी आहे ही. तर हसत म्हणतो कसा. एका मुलीची पर्स कोणा चोराने पळवली तर मुलीने पण चपळपणे पळत जाऊन त्या चोराला पकडले. आता त्याला स्वतःच्या कराटेचे कौशल्य दाखवत आहे. ते ऐकून मी पण हसले आणि सहजच माझ्या मनात विचार आला की, कालपासून किती उदाहरणे बघत आहे. एक स्त्री आणि तिची वेगवेगळी रूपे. कधी करारी तर कधी ममतामयी तर कधी महीषासुरमर्दिनीच. त्याच विचारात मी घरी कधी आले ते कळलेच नाही. घरी आले तरी तोच विचार माझा डोक्यातून जात नव्हता. एक स्त्री तिची अनेक रूपे, प्रत्येक रूप निराळे, प्रत्येकाची बलस्थाने निराळी. शेवटी न राहून मी हा विषय आई भेटायला आली होती तिच्याकडे काढला.

काही बोलायच्या ऐवजी नुसती हसलीच. म्हणाली की तुला वेळ असेल तर माझ्याबरोबर चल. उषा माझी मैत्रिण आज तिच्याकडे आख्यानाचा कार्यक्रम आहे. विषय पण भाद्रपदामधल्या देवी असाच आहे. असे नव्हते की मला स्त्री शक्ती तिच्याबद्दल माहिती नव्हते पण एका पाठोपाठच्या प्रसंगाने ते प्रामुख्याने माझ्या डोळयासमोर येत होते. आख्यान छान रंगात आले होते. मी पण मनापासून ऐकत होते. भाद्रपद महीन्यात, माहेरवाशीण गौरी, गणपतीसोबत घरात सुख, समाधान आणि प्रेम घेऊन येते. तिचं आगमन म्हणजे आनंद, मायेचा वर्षाव. गौरी म्हणजे माया, सौम्यता, श्रद्धा. ती माहेरवाशीण म्हणून येते, सण, उत्सव, आनंद घेऊन. तिचं आगमन घरात केवळ पूजेसाठी नसतं, ते असतं मुलीच्या, आईच्या, बहिणीच्या मायेचं प्रतीक. गौरी आगमन म्हणजे मायेचा साजिरा सोहळा असतो. या वेळी भाद्रपद शुध्द अष्टमी(३१ऑगस्ट) ला जेष्ठा गौरीचे आवाहन, भाद्रपद शुध्द नवमी(१ सप्टेंबर) ला जेष्ठा गौरीची पूजा तर भाद्रपद शुध्द दशमी(२सप्टेंबर) जेष्ठा गौरीचे विसर्जन आहे.

पण हीच गौरी, जेव्हा अन्याय आणि हिंसाचार समोर येतो, जेव्हा अंधार दाटतो, अन्याय माजतो तेव्हा हीच सौम्य गौरी बनते दुर्गा शक्तिरूपिणी, रक्षण करणारी, दुष्टांचा नाश करणारी! शक्ती आणि न्याय देणारी देवी. रक्षण करणारी, जागृत करणारी, लढणारी देवी. घटस्थापने(आश्विन शुध्द प्रतिपदा) पासून शारदिय नवरात्र सुरू होते. शारदीय नवरात्र, देवी दुर्गेचा महिषासुरावर झालेल्या विजयाची आठवण करुन देणारे आहे. देवी दुर्गेने नऊ दिवस व नऊ रात्री युद्ध करुन महिषासुर राक्षसाचा पराभव केला आणि दहाव्या दिवशी विजय प्राप्त केला. हा उत्सव वाईटावर चांगुलपणाच्या विजयाचे प्रतीक आहे. आजच्या जगातही हेच वास्तव दिसतं. आजची स्त्री घरात प्रेमाने, समर्पणाने संसार जपते.

ती शिक्षक असते, डॉक्टर असते, गृहिणी असते, कर्मचारी असते. ती सौम्य असते, पण कमकुवत नाही. कारण तिच्या गाभ्यात एक दुर्गा कायम जागी असते, फक्त वेळ येते तेव्हा ती प्रकट होते.

आजच्या जगात गौरी म्हणजे प्रत्येक स्त्री जी प्रेम, माया आणि आधार घेऊन येते. ती घर, समाज आणि नात्यांना जोडते, जपते. पण जेव्हा तिच्या किंवा इतरांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो, अन्याय, शोषण, अत्याचार तिच्यासमोर उभे राहतात, तेव्हा तीच स्त्री दुर्गा होते. ती आवाज उठवते, लढते, आणि न्यायासाठी उभी राहते. गौरीचं दुर्गामध्ये रूपांतर आजच्या काळात म्हणजे स्त्रीच्या सौम्यतेमागची असलेली शक्ती ओळखणं, आणि तिच्या न्यायासाठीच्या लढ्याला साथ देणं.

स्त्री ही केवळ व्यक्ती नसून एक संपूर्ण सृष्टी आहे. तिचं अस्तित्व म्हणजे एक खोल, गूढ आणि अंतर्बंधित शक्ती - जी कधी गौरीच्या स्वरूपात घरात सुख, समाधान घेऊन येते, तर कधी दुर्गा होऊन अन्याय, हिंसाचारासमोर ताठ मानेने उभी राहते. गौरी ते दुर्गा — हा प्रवास एका स्त्रीचा नाही, तर तिच्या अस्तित्वाचा एक चक्रव्यूह आहे. ती प्रेमळही आहे, आणि प्रचंडही.

आख्यान खरचं खुप छान चालले होते, माहिती असलेल्याच गोष्टी नव्या साच्यात बघत होते. तेव्हाच आख्यान करणाऱ्या बाईंनी सगळ्यांकडे पाहिले आणि म्हणाल्या की नुसते तत्वज्ञान ऐकून बहुतेक जणांना झोप यायला लागली दिसत आहे तर काही सध्याची उहाहरणे पाहू म्हणजे तुम्हाला पण मनोरंजक वाटेल. मग मी पण सरसावून बसले पुढचे ऐकायला,

लता मंगेशकर यांच्या शांत, सौम्य, कोमल आवाजाच्या गायनाने संपूर्ण भारतीयांना मोहीत केले होते पण जेव्हा त्यांनी १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर "ए मेरे वतन के लोगों" गायले तेव्हा त्याच आवाजातले त्यांचं “दुर्गा” रूप दिसले. ती प्रेमळ आवाजात बोलते, पण तीच शक्ती जनतेच्या अंतःकरणाला हेलावते.

सिंधुताई सपकाळ स्त्रीशक्तीचे गूढ रूप दाखवणारे अजून एक उदाहरण.

सिंधुताई सपकाळ या महाराष्ट्रातील एक महान समाजसेविका आणि अनाथ मुलांची माता म्हणून ओळखल्या जायच्या. त्यांच्या जीवनाचा प्रवास म्हणजेच गौरी ते दुर्गा या रूपांतराचा सुंदर आणि भावनिक प्रत्यय आहे. सिंधुताईने आपल्या आयुष्यातल्या अतिशय कठीण प्रसंगांना सामोरे जात, आपल्या प्रेमाने अनेक अनाथ आणि गरजू मुलांना आपलं जीवन दिलं. त्यांच्या मायेचा, मातृस्नेहाचा समुद्र, म्हणजेच गौरीचं रूप. सिंधुताई ने कधीही हार मानली नाही. त्यांच्या आयुष्यातली दुर्गा म्हणजे संघर्षाची शक्ती, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी आणि अनाथांच्या अधिकारासाठी लढणारी स्त्री. सिंधुताईच्या जीवनात ती सौम्य, ममता देणारी गौरी आणि जबरदस्त, संघर्ष करणारी दुर्गा, दोन्ही रूप एकत्र आहेत.

हीच आहे स्त्रीशक्तीची खोली, तिचं गूढ. जिथे प्रेम आणि ताकद एकत्र जुळून मानवतेची सेवा करतात. हेच आहे स्त्रीशक्ती - एक खोल गूढ — सौम्यतेपासून शक्तीपर्यंतचा प्रवास, मायेच्या ओंजळीतून संघर्षाच्या रणांगणापर्यंतचा प्रवास, गौरीपासून दुर्गापर्यंतचा प्रवास. म्हणून, आज आपण गौरीची माया आणि दुर्गाची ताकद दोन्ही एकत्र साजरी करूया, कारण त्यातच स्त्रीशक्तीची अमर्याद गूढ आणि खरी महानता आहे.

आणि खरचं सगळेच गुंग होऊन ऐकत होते जणू काही सगळेच आख्यान सांगणाऱ्या बाईंबरोबर सहमत होत होते. आख्यान संपले, सगळे त्यांना नमस्कार करुन निघाले, वाटेत बराच वेळ मी आणि आई शांतपणेच चालत होतो. शेवटी आईच म्हणाली मिळाली का तुझ्या प्रश्नांची उत्तरे? त्या वर मी इतकेच म्हणाले की स्त्री शक्ती अनमोल, स्त्री शक्ती अपार, प्रत्येक क्षणात तिचा ठसा, प्रत्येक पावलावर तिचा विजय. माझ्या स्त्रीत्वावर मला गर्व, माझ्या आत्मविश्वासावर मला अभिमान. आत्मविश्वास आणि सामर्थ्याची जाणीव मला योग्य दिशा देते. प्रत्येक वाटचालीत स्त्री म्हणून भाग घेते आणि स्त्री शक्तीचा अडथळा न होईल असं ठरवते.

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## गणित आयुष्याचे .....

गणित आयुष्याचे,
कोड्यासारखे असते,
कधी गूढ घटनांचे ,
अनाकलनीय भासते.....

जीवनाची वाट तर,
चालावीच लागते,
प्रश्नांचे उत्तर तर ,
शोधावेच लागते...

प्रत्येक कुलपाला ,
जशी चावी असते ,
प्रत्येक प्रश्नाला ,
तसे उत्तर असते.....

'कायझेन' सांगते,
प्रश्न समोर आहेत?
तुम्ही विचार बदला,
तुमची कृती बदलते....

अनेक मार्ग नवे,
समोर दिसतील,
सोपे उत्तर हवे,
त्याची सूत्र दिसतील...

एक दरवाजा ,
जेव्हा बंद होतो,
नविन मार्ग ताजा,
तेव्हा समोर येतो....

तेव्हा गरज असते,
आशेची, संयमाची,
दृष्टी हवी असते,
नव्या विचाराची...

\- **चित्रा मेहेंदळे. सिॲटल**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## श्री गजानन महाराज गुरुपौर्णिमा उत्सव २०२५



श्री गजानन महाराज गुरुपौर्णिमा उत्सव २०२५ ची भव्य सुरुवात १० जुलै रोजी आंबा महोत्सवाने झाली आणि उत्सवाचा समारोप श्रींच्या कृपेने गुरुपौर्णिमेच्या दिवशी अत्यंत भक्तिभावाने झाला. या पवित्र कार्यक्रमात विविध सेवांचा समावेश होता: दर्शन सेवा (२१६१ भाविकांनी लाभ घेतला), श्री स्तोत्राचे १००८ आवर्तन, सवाद्य महाआरती आणि महाप्रसाद; आमरसासाठी ३००० आंब्यांचा रस, संध्याकाळी पारंपरिक जेवण; भजन सेवा (कर्नाटकी स्कूल ऑफ म्युझिक, राम खांडेकर व नम्रता वर्तक), ज्येष्ठ भक्तांसाठी पंगत सेवा (२५९ लाभार्थी), QR कोडसह वाहन व्यवस्थापन (५००+ गाड्या), माहितीपत्रकांचे वितरण, आकर्षक सजावट सेवा, दर्शन रांग व्यवस्थापन (२०००+ भक्त), Temple Initiative व गुरुदक्षिणा टीमची सेवा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापनात बालगोपाळांचे योगदान, विविध प्रसादांची व्यवस्था, सर्व सेवकांनी एकत्रितपणे केलेली cleanup सेवा आणि नयनरम्य शेजारती. हा उत्सव श्रींच्या कृपेने आनंददायक व यशस्वीरीत्या पार पडला. श्री गजानन महाराजांची कृपा सर्व भक्तांवर सदैव राहो हीच चरणी प्रार्थना. 🙏

Organization details: *Shri Gajanan Seva*
Address: 2350 Paragon Dr, San Jose, CA 95131
Phone Number: (408) 785-1450
Hours: Thursday : 7 AM–9 PM
Saturday : 10 AM–6 PM
Sunday : 10 AM–6 PM
Website: shrigajananseva.org/
Facebook: ww.facebook.com/ShriGajananSevaBA/
Instagram: www.instagram.com/shrigajananseva/
Youtube:
www.youtube.com/@ShriGajananSevaBayAreaCA


AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com

## अवघड पण मनोरंजक परिस्थिती

वर्ष होते १९६३. रिझर्व्ह बँकेने फक्त आठ डॉलर्स आणि ८० सेन्ट्स प्रत्येकी आणावयास परवानगी दिली होती. म्हणून मी अमेरिकेतील एका गव्हर्नरच्या सेक्रेटरीला मदतीसाठी पत्र लिहिले. तिने आम्हाला मदत म्हणून २०० डॉलर्स पाठवले. ते घेऊन आम्ही टेक्सासला निघालो पण टेक्सासला पोचेपर्यंत ते पैसे संपत आले. तिथे पोचून आम्हा दोघांना, मला आणि माझ्या पत्नीला विश्वविद्यालयात नोंदणी करायची होती. म्हणून आधी आम्ही बँकेत गेलो. पासपोर्ट आणि कागदपत्रे दाखवली. तेव्हा बँक ४००० डॉलर्स देण्यास तयार होती. आम्ही एवढे नकोत म्हटले. त्यांनी आग्रह केला तेव्हा आम्ही फक्त फी पुरते आणि खर्चायला असे मिळून ५०० डॉलर्स कर्ज घेतले.
हातात पुस्तकांची पिशवी घेऊन, सौभाग्यवती रोज ५ चौक आणि मी रोज अडीच मैल शिक्षणासाठी चालत जायचो. एक आठवड्यानंतर मी चालताना एक मोटार थांबली. मला विचारले, “तुम्ही विद्यार्थी आहात ना? इतके लांब चालता का?” मी “हो” म्हटले आणि सांगितले “चालणे हा उत्तम व्यायाम आहे.” ते दोघे हसले. मोटारीत बसा म्हणाले. त्यानंतर मात्र माझे कॉलेजसाठी चालणे संपले.

एकीकडे नोकरीही होती. पगार एक डॉलर आणि दहा पैसे दर तासासाठी. थोडे पैसे वाचवल्यावर एक सायकल पाहिली, पोलीस स्टेशनवर सात डॉलर्सला मिळाली. जुन्या सायकलींचा सेल होता तो. पुढे दांडी असलेली मेनस सायकल घेतली. सगळीकडे जाणे सोयीचे होऊ लागले. लवकर येता जाता येऊ लागले. गंमत म्हणजे बायको पुढल्या दांडीवर बसून दोघे जाऊ येऊ लागलो की खिडक्या उघडून अमेरिकन्स हात दाखवीत. कारण गावात आम्ही दोघेच भारतीय असू.
आणखी गंमत म्हणजे आम्हाला अमेरिकन शाळांतून बोलावणी यायची. भारतीय विवाह व्यवस्था,आपली शिक्षण पद्धती वगैरे विषयांचे वर्णन सर्वांना ऐकावेसे वाटायाचे.
हळूहळू थोडे पैसे जमा झाले तेव्हा मोटार घेता येईल का पाहू म्हणून मोटार पाहावयास गेलो. तिथे संवाद असा झाला:
आम्ही : “गाडी घेण्याचा विचार आहे.”
विक्रेता: “चार हजाराला नवी गाडी आहे.”
आम्ही: “जुनी गाडी दाखवा.”
विक्रेता: “हि गाडी एक हजाराला उत्तम आहे.”
आम्ही: “आणखी स्वस्त.”
तो: “बरं! ती तिथली गाडी पाचशे डॉलर्सला आहे.”
आम्ही: “आणखी खूप स्वस्त असेल तरच थांबतो.”
तो: “ती त्या कोपऱ्यातली शंभर डॉलर्सला आहे.”
आम्ही: “तर मग तीच घेतो.”
असे करून शेवटी १९५४ ची फोर्ड गाडी आम्ही घेतली.

आणखी एक गंमत म्हणजे दोन आठवडे आम्ही ती गाडी चालवली. नंतर एक दिवस कॉलेजला जाताना गाडी एकदम थांबली. बंद पडली. समोर दुरुस्तीचे दुकान होते. तिथे जाऊन विचारले. तेव्हा “गाडी आत आणा” म्हणाले. मी म्हटले, “चालत नाहीये.”. त्याने बाहेर येऊन गाडीचे हूड उघडले. दांड्या हलवून म्हणाला, “सर्व्हिसिंग केव्हा केले होते?” मी विचारले, “सर्व्हिसिंग शब्दाचा अर्थ काय?”' तेव्हा तो म्हणाला, “कशाचाही थेंब राहिलेला नाही. तेल नाही, ब्रेकचे तेल नाही, ट्रान्समिशनचे तेल नाही.” मग त्याने सर्व तेलं घातली पण पैसे फार घेतले नाहीत. परमेश्वर कृपा!! अशा अनेक गमती झाल्या. त्या आठवणीत राहिल्या. त्या सांगाव्याशा वाटल्या.

\- **डॉ. प्रभाकर जी. जोशी,** इलिनॉय

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## श्रद्धांजली



**शरद शंकर देशमाने**
पी.एच.डी. ऑर्गॅनिक केमिस्ट्री
(१९ जुलै १९३५ - १९ जुलै २०२५ भारतीय वेळ)

क्लीव्हलंड मराठी मंडळाच्या संस्थापकांपैकी एक, डॉ. शरद देशमाने यांचे गेल्या १८ जुलैला (भारतीय वेळेप्रमाणे १९ जुलैला) निधन झाले. बरोबर त्याच दिवशी त्यांनी आपल्या आयुष्याची ९० वर्षे पूर्ण केलीं होतीं. त्यांच्या पश्चात् त्यांची धाकटी बहीण मीना चांदवडकर आणि तिचे यजमान अरविंद, मोठा मुलगा प्रफुल्ल आणि त्याची पत्नी सुजाता, धाकटा मुलगा अतुल आणि त्यांची नातवंडे केतकी (आणि तिचा नवरा पॅट्रिक), शंतनू, सव्यसाची आणि मालिना हे आहेत.

देशमानेंचा जन्म झाला त्यावेळी भारताच्या ब्रिटिश राजवटीविरुद्ध स्वातंत्र्यलढ्याचे शेवटचे पर्व सुरू होते. त्यात त्यांच्या कुटुंबांतील काही मंडळींचा सहभाग होता. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाला हलाखीच्या आर्थिक परिस्थितीला तोंड द्यावे लागले होते. देशमानेंच्या कोवळ्या मनावर त्या आठवणी कायमच्या कोरल्या गेल्या होत्या आणि

त्यांचा परिणाम त्यांच्या पुढील जीवनावर झाला यात शंकाच नाही. म्हणूनच लहानपणापासून त्यांच्या हृदयात देशप्रेमाची ज्योत तेवत राहिली.

त्यांतूनच पुढे उच्च शिक्षण घेण्याची आकांक्षा आणि त्यासाठी अपार कष्ट करण्याची मनाची तयारी झाली. पुढे ऑर्गानिक केमिस्ट्रीमध्ये त्यांनी पी.एच.डी. संपादन केली आणि सर्व गोष्टींचा सारासार विचार करून अमेरिकेचा रस्ता धरला.

अमेरिकेत आल्यानंतर लवकरच क्लीव्हलँड ओहायोमधील प्रसिद्ध केस वेस्टर्न रिझर्व विद्यापीठात (CWRU) १९६८ साली प्राध्यापकाची नोकरी सुरू केली.

नुसती नोकरी करून स्वस्थ न बसता जवळच्या मराठी कुटुंबांना एकत्र आणण्याचा ध्यास धरला. लवकरच या छोट्याशा मराठी गटाने क्लीव्हलँड मराठी मंडळाची स्थापना केली. सुमारे ८-१० वर्षांनंतर त्यांनी सेंट लुईस, मिसूरी येथील सिग्मा केमिकल्स कंपनीत काम सुरू केले.

वरील दोन्ही ठिकाणी स्वतःच्या संशोधनावर त्यांचा भर होताच परंतु त्याचबरोबर त्यांच्या मार्गदर्शनाखाली बऱ्याच विद्यार्थ्यांनी पी.एच.डी.चे प्रबंधही सादर केले. त्यातील काही संशोधनांचा आधुनिक वैद्यकशास्त्रावर निश्चितच कुठे ना कुठे ठसा उमटला असणारच.

देशमानेंच्या स्वभावातल्या काही ठळक गोष्टी होत्या त्या अशा: शांत स्वभाव, सतत जाणवणारी तत्परता, प्रचंड आत्मविश्वास, कधीही लोप न पावणारा आशावाद, नाविन्याचा जोश आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सगळ्यांशीच अत्यंत प्रेमळ वागणूक. बऱ्याच ठिकाणी त्यांच्या या स्वभावाचे पैलू दिसून येत.

परंतु ते सर्वात प्रकर्षाने जाणवले ते त्यांच्या पत्नीच्या दुर्धर अशा कॅन्सरच्या आजारपणात तिची काळजी घेताना. आणि तिने या जगाचा निरोप घेतल्यानंतर त्या दुःखातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी एक वेगळीच दिशा धरली. पुण्यात एक स्वत:ची जागा घेऊन वर्षातून ३-४ महिने तिकडे राहायला सुरुवात केली. त्यामुळे त्यांच्या भारताच्या भेटी वाढल्या. जुन्या ओळखींना उजाळा मिळाला. नवीन मित्रमंडळी मिळाली. त्यांच्याबरोबर पत्ते खेळणे, क्रिकेट बघणे, आंब्यांच्या मोसमात आंब्यांवर ताव मारणे, अधूनमधून मित्रांबरोबर जगप्रवास करणे वगैरे गोष्टींत त्यांनी स्वतःला झोकून दिले.


सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे क्लीव्हलंड मराठी मंडळाच्या स्थापनेत त्यांचा सहभाग होताच. पण त्यानंतर सेंट लुईसला गेल्यानंतरही तिथल्या मराठी मंडळातही ते कार्यरत राहिले. पुढे निवृत्तीनंतर कॅलिफोर्नियात बे एरियापासून सुमारे ५० मैलावर, मॅंटिका इथे राहायला गेल्यानंतरही तिथल्या मराठी मंडळात (EBMM मधे) त्यांचा नेहेमी सक्रिय सहभाग असे. निरनिराळ्या स्पर्धांत परीक्षकाची भूमिका बजावण्यापासून विजेत्या उमेदवारांना बक्षिसे प्रदान करण्यापर्यंतचा आनंद त्यांनी मिळवला.

त्यांचा मुलगा प्रफुल्ल म्हणतो, "अण्णांनी आम्हाला या स्पर्धात्मक युगात जगावं कसं हे शिकवलं. आपल्या भोवती घडणाऱ्या अनेक गोष्टी, उदा. समाजातील रूढी, अध्यात्मवाद, लोकांनी दिलेले सल्ले वगैरे गोष्टी स्वतःचा तारतम्य भाव आणि विज्ञानाच्या कसोटीवर तपासून बघूनच स्वीकारायच्या हे त्यांनी आम्हाला शिकवलं. स्वतःचं जीवन जगताना आपण दुसऱ्याचा बोजा होता कामा नये हे शिकवलं. समाजाचं आपण काहीतरी ऋण लागतो आणि त्याची परतफेड करताना दुसऱ्या कुणालाही त्याचा बोजा होऊ देता कामा नये हे शिकवलं. आपल्यांतील सर्वोच्च काय असेल तर ती एखादी व्यक्ती नव्हे तर तिने मांडलेले विचार हे शिकवलं."

त्यांच्या आत्म्यास सद्गति मिळो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

- **प्रफुल देशमाने, प्लेझंटन, कॅलिफोर्निया**







Scan the QR code to Register Now →
Or Register: https://forms.gle/1Fw8Qsvr3K27dzq9A

**Proud to Be Marathi. Bold Enough to Build Wealth Together.**
**Introducing the Global Marathi Investor Group (GMIG)**

(Sponsored By)
FICON
LAB+FUND

Use Venture / PE to create generational wealth
Learn how seasoned Marathi professionals build startups

**FICON LAB+FUND – A startup ecosystem builder**
Delivering … What investors want. What founders need. What markets demand.
Explore our story at https://www.ficonlabfund.com

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue.
The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***New York State of Mind***

**Artist: Sujata Deshmane**

Dimensions:18" x 24"
Medium: acrylic paint on canvas
Price:Not for Sale
Mandal: EB Marathi Mandal



***Keep it Clean***

**Artist: Avi Sadhu**

Dimensions:21"x25"
Medium: Oil on wooden board
Price:Not for Sale
Mandal: MMLA



***Rustic Serenity***

**Artist: Bharti Gorkar**

Dimensions:24"x20"
Medium: Oil
Price:$800
Mandal: Seattle Maharashtra Mandal



**Artist: Chitra Juvekar Mehendale**

Dimensions: 8"x8"
Medium:Water colour
Price:Not for Sale
Mandal: Seattle MM



***Engrossed***

**Artist: Priya Welankar Shah**

Dimensions:20"x24"
Medium: Oil
Price:$500
Mandal:Triveni, Cincinnati



***Tiger Lilies***

**Artist: Vinita Mohite**

Dimensions:16" x 20"
Medium: oil on Aluminum panel.
Price:Not for Sale
Mandal: Seattle Maharashtra Mandal

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.